# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४२ वी बैठक दि.१३ जानेवारी २००५

## ठराव

मा.ना.रामराजे नाईक निंबाळकर, मंत्री जलसंपदा (कृ.खो.पा.म.) व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४२ वी बैठक दि.१३.१.०५ रोजी जलसंपदा विभागाचे परिषद सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र.४२/१:-**

**"ठराव करण्यांत येते की, नियामक मंडळाच्या ४१ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यांत येत आहेत."**

**ठराव क्र. ४२/२**

**"ठराव करण्यात येतो की, ३१.३.२००४ पर्यंतचा महामंडळाचा रु.१६११४ कोटीचा ताळेबंद व वर्ष २००३-०४ चे नफातोटा पत्रक स्विकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "**

**ठराव क्र.४२/३ :**

**"ठराव करण्यात येतो की, विषयांकित प्रकरणी दावा क्र. ६७८/२००१ व २३४/२००० अन्वये न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार संबंधितांच्या वारसदारांस अदा करावयाची एकूण रक्कम रु. १०,८९,३४२/- भरण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र.४२/४ :**

**"महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना दरमहा वेतन मिळण्यासाठी तीन महिन्यांची मान्यता एकदमच द्यावी व दरमहिन्याला प्रत्यक्ष वेतन द्यावे. तसेच महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम त्वरित द्यावी व वित्त विभाग व महामंडळाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा असे नियामक मंडळाने सूचीत केले."**

R Nimbal

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे



DIR_Meet42_SGG

ठराव क्र.४२/५ :

"महामंडळाकडील थकित देयकांपैकी भू-संपादन,पुनर्वसन,खात्यातंर्गत(उदा. यांत्रिकी, वन विभाग,सार्वजनिक बांधकाम)देण्याकरिता पुढील वर्षाचे अंदाजपत्रकात रु.३५५.९१ कोटीची तरतूद करण्याची विनंती वित्त सचिव यांना महामंडळाने केली."

ठराव क्र.४२/६:

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळांतर्गत देण्यात येणाऱ्या विविध परवानग्यांसाठी परवाना शुल्क/दर आकारणी करण्याबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. तसेच मंजूर केलेल्या परवाना शुल्क/दर आकारणीत दरवर्षी कमाल १० टक्के पर्यंत वाढ करण्याचे अधिकार महामंडळाच्या कार्यकारी संचालकास प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे." विविध परवानग्यांचे दर सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र.१ प्रमाणे आहेत.

ठराव क्र.४३/७

ठराव करण्यात येतो की, कलम-१८ नुसार भूसंपादित जमिनीच्या मोबदल्यात वाढीसंबंधी उपाययोजनेचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ठराव क्र.४२/८ :

"मकृखोविम कर्जरोखे मालिकांमध्ये संस्था प्रकार निहाय गुंतवणूक प्रमाण (संस्थात्मक वर्गीकरण) हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत ठराव करण्यात आलेला नाही"

ठराव क्र. ४२/९ :

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील मोठ्या व मध्यम प्रकल्पांना केंद्रिय जल आयोगाची मान्यता घेण्याच्या कामी केंद्रिय जल आयोगाच्या अधिकाऱ्यांना सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. केंद्रिय

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

जल आयोगाच्या योग्य त्या अधिकाऱ्यांच्या नेमणूकीची व त्यांची फी निश्चित करण्याची कार्यवाही मा.अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांचे मान्यतेने कार्यकारी संचालक यांचे स्तरावर करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४२/१०

"ठराव करण्यांत येतो की, श्री स्वामी समर्थ ग्रामविकास प्रतिष्ठान, श्रीगोंदा यांचा श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयास भाडेपट्टयाने दिलेल्या जमिन व इमारतीचे भाडे नाममात्र दराने देण्याचा प्रस्ताव सद्यस्थितीत स्थगित ठेवण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

ठराव क्र.४२/११

"ठराव करण्यात येतो की, जलविद्युत प्रकल्पांचे बांधकाम महामंडळाद्वारे हाती घेण्यासाठीच्या कार्यपध्दतीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

ठराव क्र.४२/१३

"ठराव करण्यात येतो की, बोरिवडे व बोरपाडळे या ल.पा.तलावांना शासनाची नव्याने प्रशासकिय मान्यता घेण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

ठराव क्र.४२/१४

"ठराव करण्यात येतो की, नीरा देवघर प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या साळव, दापकेघर, कोंढरी, देवघर व पऱ्हर खुर्द या पाच गावातील प्रकल्पग्रस्तांना रु.८१,३४,८२५/- इतके सानुग्रह अनुदान मिळणेचा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

DIR_Meet42_SGG